सुरगाणा, जि. नाशिक येथील धान्य
अपहाराच्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील
लेखा परिक्षणाबाबत

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः सकीर्ण:- ४५१५/२००/प्र.क्र.८९२/भाग-२/ नापु-१६-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, (विस्तार) मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ जानेवारी, २०१६

वाचा

उपविभागीय पोलीस अधिकारी, कळवण विभाग, जि. नाशिक यांचे पत्र क्र. कविक/ वाचक/ जा.क्र.२६५२/२०१५, दि. २४.७.२०१५

प्रस्तावना

सुरगाणा, जि. नाशिक येथील शासकीय गोदामाच्या तपासणीअंती धान्यात मोठया प्रमाणावर तफावत आढळून आली आहे. या प्रकरणी संबंधीताविरूध्द प्रशासकीय तसेच फौजदारी स्वरूपाची कारवाई सुरू आहे. यासंदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी, कळवण यांच्या नाशिक येथील सर्व तालुक्यांच्या लेख्यांचे डिस्पॅच आर्डरनिहाय लेखा परिक्षण करून अहवाल देण्याच्या विनंतीनुसार लेखा परिक्षण पथक नेमण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय

माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सुरगाणा येथील शासकीय गोदामाच्या तपासणीअंती मोठया प्रमाणावर अन्नधान्यामध्ये तफावत आढळून आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, कळवण यांच्या नाशिक येथील सर्व तालुक्यांच्या लेख्यांचे डिस्पॅच आर्डरनिहाय लेखा परिक्षण करून अहवाल देण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार लेखा परीक्षण पथक गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्यानुसार वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय व पुरवठा आयुक्त कार्यालयाच्या खालील अधिकारी व कर्मचारी यांचे लेखा परीक्षण पथक स्थापन करण्यात येत आहे.

अ. क्र.	अध्यक्ष/ सदस्यांचे नाव व पदनाम	समितीमधील पद
१.	श्री. सु.मा. काटे, सहायक संचालक,वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय	अध्यक्ष
२.	श्री.वि.पु.साहील,सहायक लेखा अधिकारी,वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय	सदस्य
३.	श्री.या.रा.गवई,सहायक लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय	सदस्य
४.	श्री. एस.एम.जाधव, सहायक संचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय	सदस्य
५.	श्री. प्र.म. खरात, अधीक्षक, पुरवठा आयुक्त कार्यालय	सदस्य

उक्त पथकाने नाशिक जिल्हयातील सर्व तालुक्यांचे अन्नधान्य वितरण विषयक लेखा परीक्षण करून अंतिम अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

या लेखा परीक्षण पथकास जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांनी आवश्यक ती माहिती पुरवावी तसेच अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून सहकार्य करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१४४४५३४५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Dnyandeo Redekar

Digitally signed by Suresh Dnyandeo Redekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FCSCP DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=00b6deeb0e386eb5698cc129016108429cd770a158e87c3a2a96134dccfff610, serialNumber=b0c49d4a2d63d7827dd22b5ccbfc134f691b42353bcee54455b220aff75b429c, cn=Suresh Dnyandeo Redekar
Date: 2016.01.16 14:46:50 +05'30'

सु.ज्ञा.रेडेकर

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त, नाशिक.
३. सह सचिव/ उप सचिव (सर्व) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
४. वित्तीय सल्लागार व उप सचिव , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ८ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, प्रशासकीय आवार, मुंबई.
५. जिल्हाधिकारी, नाशिक
६. जिल्हा पोलीस अधीक्षक, नाशिक.
७. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई.
८. उप आयुक्त, पुरवठा नाशिक.
९. उप विभागीय पोलीस अधिकारी, नाशिक.
१०. जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक.
११. संबंधीत समितीचे अध्यक्ष व सदस्य (वित्तीय सल्लागार व उप सचिव आणि पुरवठा आयुक्त कार्यालयामार्फत)
१२. निवड नस्ती/ नापु-१६-ब.